# वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ

**परभणी-431402(महाराष्ट्र) भारत**

**************************************************************************

संदर्भ :- १. शासन परिपत्रक , सामान्य प्रशासन विभाग, समय/२०२०/प्र.क्र.३१/१८ दि.१६/०३/२०२०.

२. विद्यापीठ परिपत्रक क्र.अेपीआर- २/२०२० दि.१६/०३/२०२०.

३. शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, समय/२०२०/प्र.क्र.३१/१८ दि.२८/१०/२०२१.

४. विद्यापीठ परिपत्रक जा.क्र.समय/२०२३/बायोमॅट्रिक/प्र.क्र.२८५/आस्था-७/३७१३ दि.१८/०८/२०२३.

विद्यापीठातील अधिकारी / कर्मचारी यांची
बायोमॅट्रिक प्रणालीवर उपस्थिती नोंदविणे बाबत.

## परिपत्रक

जा.क्र.समय/२०२३/बायोमॅट्रिक/प्र.क्र.२८५/आस्था-७ /4803

दिनांक:- ~~२०~~ ३० /१०/२०२३.

प्रकरणी, विद्यापीठातील अधिकारी / कर्मचारी यांची दैनंदीन कार्यालयीन उपस्थिती ही बायोमेट्रिक पध्दतीने नोंदविणेबाबत यापुर्वी संदर्भीय क्र.०४ वरील विद्यापीठ परिपत्रकानुसार निर्देशीत करण्यात आलेले होते, त्यामध्ये असेही नमुद करण्यात आले होत की, याशिवाय वेतन देयके स्विकारले / अदा केले जाणार नाही असे असतांना मात्र दैनंदीन कार्यालयीन उपस्थिती ही बायोमेट्रिक पध्दतीने नोंदविल्या जात नसल्याचे निदर्शनास आलेले आहे,

**सबब,** प्रकरणी मा. कुलगुरू महोदय, यांचे निर्देशानुसार पुन:श्च सुचित करण्यात येते की, विद्यापीठातील अधिकारी / कर्मचारी यांची दैनंदीन कार्यालयीन उपस्थिती ही बायोमेट्रिक पध्दतीनेच नोंदविण्यात यावी तसेच ज्या कार्यालयांनी वेतन देयकासोबत बायोमेट्रिक उपस्थिती जोडलेली आहे, अशाच कार्यालयाची वेतन देयके स्विकारले / अदा केले जातील, त्यामुळे उपरोक्त सूचनांचे सर्व आस्थापना यांनी गांभीर्याने दखल घ्यावी.

**मा.कुलगुरु महोदय यांचे निर्देशानुसार..**

(पु.कों.काळे)
कुलसचिव

**प्रत योग्य त्या कार्यवाहीस्तव :-**

१.संचालक शिक्षण तथा अधिष्ठाता (कृषि) /संचालक संशोधन/संचालक विस्तार शिक्षण/विद्यापीठ अभियंता, वनामकृवि परभणी यांना त्यांच्या अधिनस्त यंत्रणांना सूचित करण्यासाठी अग्रेषित.

२.सर्व कार्यालय प्रमुख / प्रभारी अधिकारी यांना योग्य त्या कार्यवाहीस्तव.

३. सर्व आहरण व सवितरण अधिकारी यांना माहीतीस्तव.

४.नियंत्रक,वनामकृवि,परभणी यांना सूचित करण्यात येते की, त्यांनी केवळ बायोमॅट्रिक उपस्थिती विचारात घेऊनच वेतन देयके स्विकारावीत प्रकरणी उपरोक्त निर्देशानुसार उचित कार्यवाहीस्तव.

✓५.प्रभारी अधिकारी तथा नोडल ऑफीसर,मध्यवर्ती संगणक केद्र, वनामकृवि परभणी यांना देवुन कळविण्यात येते की, सदर परिपत्रक विद्यापीठ संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात यावे.

**६.प्रभारी अधिकारी, खर्च काढण्याची योजना, वनामकृवि परभणी** अंतर्गत योजनेमधील कृषि सहायक/इतर कर्मचारी यांना दिले गेलेले गावसमूहाच्या ठिकाणी उपस्थिती नोंदविण्याकरीता संबंधीत कर्मचारी यांनी मोबाईल मध्ये Note Cam ॲप डाउनलोड करून त्यामधून स्वत:चे फोटो घेवून उपस्थिती नोंदवावी, सदरची उपस्थिती ही लगतच्या पर्यवेक्षकीय अधिकारी यांनी Note Cam मधील फोटोवर असलेल्या उपस्थितीची/स्थळाची खात्री करून स्पष्ट शेरा/ अभिप्राय नोदविण्यात येवून वेतन देयकासोबत सलग्न करावे.

७.मा.कुलगुरु महोदय, यांचे खाजगी सचिव यांना माहीतीस्तव.